# जिल्हा स्त्री रुग्णालय, अकोला

## दुचाकी/ चारचाकी स्टॅन्डच्या वार्षिक कंत्राटाबाबत ( २०२०-२०२१)

## (दुसरी वेळ)

जिल्हा स्त्री रुग्णालय,अकोला येथील दुचाकी /चारचाकी वाहनाकरीता वाहनतळाबाबत नोदणीकृत संस्था कडुन दि. ०६/०८/२०२० ते १२/०८/२०२० या कालावधीत (सुटीचे दिवस वगळून) कंत्राटाकरीता खालील अटी व शर्ती नुसार निविदा मागविण्यात येत आहे.

अटी व शर्ती :

१) दुचाकी व चारचाकी वाहनाच्या स्टॅन्डचा कंत्राट दि.१४/०८/२०२० ते १३/०८/२०२१ पर्यंत अमलात राहील.

२) रुग्णालयात येणा-या सर्व सायकली /दुचाकी वाहने / चारचाकी वाहने हे सायकल स्टॅन्डवर राहतील. बोर्ड बनविण्याचा व कुंपनाचा संपुर्ण खर्च कंत्राटदारास स्वतः करावा लागेल. बोर्ड वर संस्थेच्या नावाचा उल्लेख करावा लागेल.

३) वाहनतळ २४ तास चालु राहील.

४) आपण नियुक्त केलेल्या कर्मचा-याची वागणुक जनता व कर्मचारी यांचेशी सौजन्यपुर्वक राहावी. कमीतकमी दोन कर्मचा-यांची नियुक्ती करणे (प्रति शिफट) आवश्यक राहील.

५) कर्तव्यावर बालकामगार ठेवता येणार नाही.

६) दुचाकी वाहन अथवा चारचाकी वाहन चोरी गेल्यास त्याची नुकसान भरपाई करण्याची संपुर्ण जबाबदारी सर्वस्वी कंत्राटदाराची राहील.

७) या रुग्णालयात काम करणारे कर्मचारी तसेच बाहेरुन येणारे शासकीय कर्मचारी यांचेकडुन शुल्क घेता येणार नाहीत.

८) वाहनतळाची निविदा भरण्या-यास रु.२५०००/- (अक्षरी रु पंचविस हजार फक्त) अनामत रक्कम म्हणुन भरावी लागेल.

९) निविदेमध्ये कंत्राट मंजुर झाल्यावर कंत्राट घेण्यास नकार दिला तर अनामत रक्कम परत मिळणार नाही व सदर कंत्राट दुस-या कंत्राटदारास देण्यात येईल.

१०) दुचाकी/ वाहनांकरीता शुल्क रु ५/- (रुपये पाच फक्त) व चारचाकी वाहनाकरीता रु २०/- (रुपये विस फक्त) घ्यावे लागेल व त्याकरीता वरील प्रमाणे नियम बंधनकारक राहतील.

११) दुचाकी वाहनाची १२ तासाकरीता प्रत्येकी रु ५/- व चारचाकी वाहनाकरीता प्रत्येकी रु २०/- शुल्क घ्यावे लागतील.व त्याची रितसर पावती द्यावी लागेल.

१२) कंत्राटदाराने आपले पूर्ण नाव व पत्ता व वाहनतळावर काम करणा-या व्यक्तीचे पुर्ण नाव व पत्ता या कार्यालयास द्यावा. तसेच वाहनतळावर काम करणा-या कर्मचा-याचे पोलिस अहवाल या कार्यालयास एक महिन्याच्य आत सादर करावे

लागतील. कंत्राटदारामार्फत अधिकार दिलेल्या व्यक्तीला त्याचे ओळखपत्र द्यावे व ते केव्हा हि दाखवता येईल असे करावे.

१३) निविदा स्विकारण्याचा किंवा रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार वैद्यकीय अधिक्षिका यांनी राखुन ठेवलेला आहे.

१४) ज्या संस्थाधारकाच्या नावाने निविदा मंजुर होईल त्या कंत्राटदारास अटी व शर्ती मंजुर असल्याबाबतचा करारनामा रु १००/- चे स्टॅप्म पेपरवर लिहुन द्यावे लागेल.त्याकरीता येणारा खर्च स्वतःच करावा लागेल.

१५) रुग्णालयाचे आवारात दुचाकी / चारचाकी वाहने आंतररुग्ण ईमारतीच्या बाजुला असलेल्या चौकीदारा रुमच्या पुढे उभ्या करता येणार नाही.

१६) जे संस्थाधारक निविदा भरणार आहेत त्यांचेवर कोणत्याही प्रकारचे गुन्हे दाखल नसावे.

१७) जे संस्थाधारक निविदा सादर करणार आहे त्यांचेकडे ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

१८) जे संस्थाधारक दुचाकी /चारचाकी वाहनाचे निविदा भरणार आहे त्या संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र / संस्थेचे पॅन क्र./संस्थेचे मागील वर्षाचे उलाढाली बाबतचे बॅकस्टेटमेंन्टची प्रत सादर करावी लागेल.

१९) निविदा सादर करताना लिफाफा क्रं.१ मध्ये संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र / संस्थेचे पॅन क्रं./ संस्थेचे मागील वर्षाचे उलाढाली बाबतचे बॅकस्टेटमेंटची प्रत सादर करावे लागेल व लिफाफयावर क्रं.१ हे नमुद करणे आवश्यक आहे.

२०) निविदा सादर करतांना लिफाफा क्रं.२ मध्ये कंत्राटाचे (वार्षिक) दर सादर करावे लागेल व लिफाफयावर क्रं.२ हे नमुद करणे आवश्यक आहे.

२१) वरील प्रमाणे सर्व अटी व शर्ती मान्य असणे आवश्यक आहे.
निविदा दि. १३/०८/२०२० रोजी दु.१.०० वाजता निविदा समिती व निविदाधारक समक्ष उघडण्यात येतील. निविदाधारक उपस्थित नसल्यास निविदा समिती समक्ष निविदा उघडण्यात येतील.

२२) नातेवाईक/ रुग्ण हयांचेकडुन जास्तीचे शुल्क आकारल्यास अशा प्रत्येक वैद्य तक्रार /घटने करीता रु ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) दंड संबंधित कर्मचारी किंवा कंत्राटदाराकडुन त्याच दिवशी वसुल करण्यात येईल.

(डॉ.आरती एल.कुलवाल)
वैद्यकीय अधिक्षिका
जिल्हा स्त्री रुग्णालय,अकोला.